महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-व्हीपीडीएम१३८९/३०१८/२२
मंत्रालय, मुंबई -४०००३२ दिनांक २३ ऑगस्ट १९८९.

वाचा:- १] शासन पत्र ग्रा. वि. वि. क्रमांक-व्हीपीएम११६५/१६१००/ई, दि. २८/७/६५
२] शासन परि. ग्रा. वि. वि. क्र. व्हीपीएम१९६५/१०१९२-ई दि. २२/७/६५
३] शासन पत्र ग्रा. वि. वि.क्र. व्हीपीएम११६९/५१५२०-ई, दि. ३०/१२/६९
४] शासन पत्र क्र. व्हीपीएम१३८७/२८०१/३०८६/२२, दिनांक ३/११/८७

शासन परिपत्रक:- जिल्हा ग्रामीण विकास निधीबाबत शासनाने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. या सूचना अेकत्रित करून सर्व समावेशक सूचना शासन आता देत आहे:—

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८च्या कलम१३३च्या तरतुदीनुसार स्थापन केलेल्या जिल्हा ग्रामीण विकास निधीत पंचायतीच्या एकूण उत्पन्नाच्या ५% या अधिनियमाखाली तयार करण्यात असलेल्या मुंबई जिल्हा ग्रामीण विकास नि. नियम१९६०मधील नियम४च्या तरतुदीनुसार, जमा करणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. सदर निधी हा जिल्हा परिषद स्थायी समितीकडे निहित केला आहे. अधिनियमातील कलम४५च्या तरतुदीनुसार अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची१मध्ये समाविष्ट केलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, पंचायतीच्या आवश्यकतेनुसार त्यांना कर्ज मंजूर करणे, तसेच त्यांनी जमा केलेल्या अंशदानावर त्यांना व्याज देणे या प्रयोजनासाठी या निधीचा विनियोग करावा. या निधीची विनियोग करताना नियमानुसार विहित केलेली कार्यपद्धती काटेकोरपणे अंमलात आणावी.

२. निधीची गुंतवणूक:- मुंबई जिल्हा ग्रामीण विकास निधी नियम१९६०मधील नियम५च्या तरतुदीनुसार स्थायी समितीने निधीत जमा असलेल्या सर्व रकमा ग्रामपंचायतीना कर्ज देण्यासाठी किंवा त्यांच्या गुंतवणूकीवरील व्याज देण्यासाठी तातडीची आवश्यकता नसेल तर,

[अ] केंद्र किंवा राज्य शासनाच्या तारणपत्रांत किंवा

[ब] राज्य शासन परवानगी देईल अशा इतर तारणपत्रामध्ये, किंवा

[क] सरकारी कोषागारात किंवा सरकारी कोषागाराचे काम ज्या बँकेकडे सोपविण्यात आले असेल त्या बँकेत किंवा

[ड] राज्य शासन मान्यता देईल अशा सरकारी बँकेत ठेवल्या पाहिजे. किंवा

[ई] बँक शासन पुरस्कृत आणि त्यावरील व्याजांची हमी शासनाने दिली

जिल्हा प... शासकीय नोंदणी शाखा
संदर्भ क्र.-
दाखल दिनांक
खाते प्रमुख
विभाग
5 SEP 1989
निकालाचा दिनांक

असेल तर अल्पबचत योजनेत गुंतविण्यात यावयात.

३. राज्य शासनाने खालील शर्ती व निर्बंधाच्या अधीन स्थायी समितीकडे विहित असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास निधीतील रकमा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे गुंतविण्यास मंजूरी दिली आहे:-

अ] जिल्हा मध्यवर्तीसहकारी बँक व जिल्हा परिषदेचे संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांच्या संमतीने, ठरविल्यानुसार जिल्हा परिषदांनी ओव्हर ड्राफ्टची सोय उपलब्ध करुन द्यावी.

ब] जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाच्या ठिकाणच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत स्थायी समितीने जिल्हा ग्रामीण विकास निधीचे खाते सुरु ठेवावे.

क] जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सोयीनुसार जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी निधी संबंधी व्यवहार होण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पुरेशी व्यवस्था करावी.

४. या निधीतून कर्जे मंजूर करताना मुंबई मुद्रांक शुल्क नियमाच्या नियम५[ह] ची अनुसूची १अन्वये खंड[अ] ते[ग]मध्ये समाविष्ट केलेल्या करारांव्यतिरिक्त इतर करारांसाठी रु १०मूल्यांच्या मुद्रांकदस्त ऐवजाचर हमी पत्र घेण्यांत यावे.

६. वरील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सुं.श्री.कुळकर्णी

[सुं. श्री. कुळकर्णी]

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१] सर्व विभागीय आयुक्त,
२] सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
३] सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
४] मुख्यलेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, मुंबई
५]उप मुख्य लेखा परिक्षा, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबईपुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
६] महसूल व वन विभाग
७]कक्ष अधिकारी कार्यासन क्रमांक २१, २१अ
८] निवड नस्ती कार्यासन २२

कतळी/२२८८९